# University of Mumbai

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

**क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ ९३३/२०१६**

**परिपत्रक :–**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक No.Exam/Sc/873 af 2016 दि. २२ मार्च, २०१६ अन्वये M.K.C.L. या अभिकरणामार्फत Online परीक्षाप्रवेश अर्ज स्विकारण्यात आलेल्या शिक्षणक्रमाचा विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाने घेतलेल्या अंतर्गत परीक्षांचे गुण Online पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते; तसेच पुन्हा विद्यापीठ परिपत्रक क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ ९१६८/२०१६ दि. १३ मे, २०१६ अन्वये सुध्दा Online परीक्षा प्रवेश अर्ज घेतलेल्या व ज्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पध्दतीने स्विकारण्यात आलेले आहेत अशा सर्व परीक्षांचे अंतर्गत परीक्षांचे गुण विद्यापीठाकडे पाठविण्यासंदर्भात कळविण्यात आलेले होते.

याबाबत असे निर्दशनास येते की, अद्यापही बऱ्याचश्या महाविद्यालयांकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षांचे गुण पाठविण्यात आलेले नाहीत.

तरी याबाबत पुनःश्च असे कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पाठविले नसतील अशा महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पद्धतीने परिपत्रक मिळाल्यापासून शक्य तितक्या लवकर म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत दोन दिवसांच्या आत पाठवावेत व त्याची Hard Copy विद्यापीठाकडे जमा करावी.

तसेच ज्या शिक्षणक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने स्विकारण्यात आलेले आहेत या शिक्षणक्रमासाठीचे विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही काही महाविद्यालयांकडून प्राप्त नाहीत. तरी ज्या महाविद्यालयांकडून या शिक्षणक्रमाचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही विद्यापीठात सादर केलेले नाही त्यांनी ते हे परिपत्रक मिळाल्यापासून शक्य तितक्या लवकर म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत परिपत्रक मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत विद्यापीठाकडे सादर करावेत.

ज्या महाविद्यालयाकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण उपरोक्त नमुद मुदतीत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात प्राप्त न झाल्यास त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व यांस संबंधीत महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. २६ मे, २०१६.